प्रेस नोट ता. २२/०४/२०२३

# सोन्याचे दागीने चोरणारा चोरटा जेरबंद - पाच तोळयाचे दागीने हस्तगत

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

**पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४५३/२०२३ भादवि कलम ३८० प्रमाणे**

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी पिंपरी चिंचवड शहरामध्ये घडणारे घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले होते.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे व सहा.पोलीस आयुक्त पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी अधिपत्याखाली पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करुन सातत्याने चोरीचे गुन्हे घडणा-या भागात पेट्रोलिंग वाढवुन गोपनिय बातमीदारांकरवी माहीती घेण्यात येत होती.

एटलास कॉलनी, महेशनगर , पिंपरी येथे राहणारे श्री अमोल दिलीप सावंत हे महेंद्रा इंटर नॅशनल स्कुल हिंजवडी येथे तसेच त्यांच्या पत्नी डॉ. डी.वाय.पाटील हॉस्पीटल मध्ये नोकरीस आहेत. दिनांक १७/०४/२०२३ रोजी नेहमीप्रमाणे नोकरीसाठी गेले असतांना सायंकाळी ५.०० वा. चे सुमारास राहते घरातुन सोन्याचे गंठन, मिनी गंठन, सोन्याची ठुशी, अंगठी असा सोन्याचा ऐवज चोरीस गेल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी पिंपरी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे. गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी पोलीस अंमलदार यांना सदर चोरीबाबत तपासाच्या सुचना देवून समांतर तपास सुरु केला.

घटनास्थळी भेट देवून पाहणी केली असता फिर्यादी यांचे दरवाजाचे कुलुप किंवा कडी-कोयंडा तोडलेला नव्हता त्यामुळे सखोल माहीती घेवून परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची सातत्याने वेळोवेळी पाहणी केली. चोरटयाच्या अंगुलीमुद्राबाबत तपास केला. चोरटयाने बनावट चावीचा वापर केला असावा असा संशय बळावल्याने त्या अनुषंगाने कौशल्याने व सचोटीने तपास सुरु असतांना गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार पोलीस नाईक १९२३ आतिष कुडके व पोकॉ १९३१ शिवाजी मुंढे यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी मिळालेल्या बातमीवरुन सपोफौ शिवानंद स्वामी, पोना १९२३ आतिष कुडके, १९२४ नामदेव कापसे, पोकॉ १९३१ शिवाजी मुंढे, १९२० अजित सानप, २०९७ उध्दव खेडकर अशांनी नेहरुनगर पिंपरी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात सापळा लावुन इसम नामे उमेश रमेश भोसले वय २८ वर्षे धंदा- हॉटेल कुक रा. मुळ चिंचोली ता. आवसा जिल्हा लातुर सध्या शिवदत्त रिसॉर्टमध्ये शिरकोली ता. वेल्हे जि. पुणे यास सोन्याचे गंठन, सोन्याची ठुशी, सोन्याचे मिनी गंठन व सोन्याची अंगठी असा एकूण १,५०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीन्यासह ताब्यात घेवून कसुन चौकशी केली असता त्याने ओळखीचा फायदा घेवून बनावटी किल्लीचा वापर करुन चोरी केल्याची कबुली दिली. सदर चोरटयाकडे इतर घरफोडी चोरी गुन्हयांचे अनुषंगाने सखोल तपास करुन गुन्हयाचेकामी पिंपरी पोलीस स्टेशनला हजर केले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री मनोज लोहीया, अप्पर पोलीस आयुक्त डॉ. श्री संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस अंमलदार शिवानंद स्वामी, पोना १९२३ आतिष कुडके, १९२४ नामदेव कापसे, पोकॉ १९३१ शिवाजी मुंढे, १९२० अजित सानप, २०९७ उध्दव खेडकर यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड